अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत केलेल्या पदांच्या मर्यादेबाबत

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : अकंपा -१२१८/प्र.क्र.०१/आठ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १५ फेब्रुवारी, २०१८.

**वाचा :**

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००४/प्र.क्र. ५१/ २००४/आठ, दिनांक २२/८/२००५

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र. ३४/ आठ, दिनांक १/३/२०१४

३. शासन पूरक पत्र,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र. ३४/ आठ, दिनांक २/५/२०१४

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४१/ अर्थ-१, दिनांक २/६/२०१५

५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१५/प्र.क्र.१२७/ आठ, दिनांक २०/६/२०१५

६. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४१/ अर्थ-१, दिनांक २३/९/२०१५

७. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१२१५/प्र.क्र.४७/ आठ, दिनांक २८/१०/२०१५

८. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.५७/२०१५/ विसु-१, दिनांक १४/०१/२०१६

९. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.४६/ आठ, दिनांक ०३/०५/२०१७

**प्रस्तावना :**

अनुकंपा नियुक्तीसाठी गट- क आणि गट- ड मध्ये प्रतीवर्षी रिक्त होणा-या पदांच्या ५% पदांची मर्यादा संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ अन्वये विहीत करण्यात आली होती. संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक ०१.०३.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सदर ५% ची मर्यादा वाढवून ती एक वर्षासाठी १०% इतकी करण्यात आली. संदर्भाधीन शासन निर्णय क्र. ७ अन्वये सदर १०% ची मर्यादा दि. २८.०२.२०१७ पर्यंत चालू ठेवण्याबाबतचा निर्णय तसेच संदर्भाधीन शासन निर्णय क्र. ४ व ६ च्या अनुषंगाने पदभरतीवरील निर्बंध असेपर्यंत गट-क व गट-ड संवर्गातील एका वर्षात भरण्यास मान्यता असलेल्या रिक्त पदांच्या १०% पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. संदर्भाधीन शासन निर्णय क्र.९ अन्वये सदर १०% च्या मर्यादेस दिनांक ०१.०३.२०१७ पासून पुढे २ वर्षे (दिनांक २८.०२.२०१९ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली आहे.

संदर्भाधीन शासन निर्णय क्र. ४ व ६ अन्वये पदभरतीवर निर्बंध आहेत. तसेच संदर्भाधीन शासन निर्णय क्र. ८ अन्वये गट-ड संवर्गात मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे निरसित करावयाची आहेत. त्यामुळे अनुकंपा नियुक्तीसाठी प्रति वर्षी रिक्त होणा-या पदांच्या ५% असलेली मर्यादा ही १०% इतकी वाढवून सुध्दा अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या कमी प्रमाणात होत आहेत ही बाब विचारात घेऊन शासनाचे पदभतीवरील निर्बंध असेपर्यंत अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत केलेल्या १०% च्या मर्यादेमध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

संदर्भाधीन क्रमांक ९ येथील शासन निर्णयान्वये अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी प्रतीवर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% च्या मर्यादेस दिनांक ०१.०३.२०१७ पासून पुढे २ वर्ष (दिनांक २८.०२.२०१९ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली आहे.

**तथापि संदर्भाधीन क्र. (४) व (६) येथील शासन निर्णयानुसार पदभरतीवरील असलेले निर्बंध विचारात घेता प्रस्तुत निर्बंध असेपर्यन्त गट-क व गट-ड संवर्गातील एका वर्षात भरण्यास मान्यता असलेल्या रिक्त पदांच्या २०% पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत. तसेच सदर २०% ची मर्यादा ही दि. ०१ जानेवारी, २०१७ पासून ते पदभरतीवरील निर्बंध असेपर्यंत लागू राहील.**

२. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४०/२०१८/आपुक, दि. २५.०१.२०१८ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२१५११३३०५१००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee529 94443a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b945 0f867605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2018.02.15 11:39:15 +05'30'

**(गीता रा. कुलकर्णी)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, .
३. मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. सर्व सन्माननीय विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य.

५. मा. मुख्य सचिव
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
७.सर्व मंत्रालयीन विभाग,
८. प्रबंधक मूळ शाखा, उच्च न्यायालय,मुंबई,
९. प्रबंधक अपिल शाखा, उच्च न्यायालय,मुंबई,
१०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
१२. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१३. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, (विधान परिषद), मुंबई,
१४. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र,मुंबई,
१६. महालेखापल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, मुंबई,
१७. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१,महाराष्ट्र, मुंबई,
१८. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१९. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
२१. मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे),कोकण भवन,नवी मुंबई,
२२. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
२३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२४. निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२५. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२६. निवड नस्ती. (कार्यासन-८)